पारशिवनी, रामटेकात घरफोडी

पारशिवनी : चोरट्याने घराचे कुलूप तोडून ४५ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना स्थानिक वॉर्ड क्र. ३, पारशिवनी येथे २२ फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास घडली. फिर्यादी कीर्ती रमेश मेहर (३०, पारशिवनी) या दुपारच्या सुमारास काही कामानिमित्त घराबाहेर गेल्या होत्या. दरम्यान चोरट्याने संधी साधून त्यांच्या दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व गोदरेजच्या कपाटातील सोन्याचे दागिने व रोख १० हजार रुपये असा एकूण ४५ हजारांचा ऐवज चोरून नेला. दुसरी घटना त्याच दिवशी रामटेक तालुक्यातील मनसर वॉर्ड क्र. ५ मध्ये घडली. चोरट्याने फिर्यादी रंजू बारसू भांडे (४५) यांच्या तसेच शेजारच्या घराचे कुलूप तोडून आलमारीत ठेवलेले दागिने व रोख २४ हजार असा एकूण ३० हजारांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी पारशिवनी व रामटेक पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद केला असून आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास साहाय्यक फौजदार हंसराज वरखेडे, पोलीस हवालदार रामेश्वर रावते करीत आहेत.

खापा येथे गाडगेबाबा जयंती

खापा : परिसरात गुरुवारी (२३ फेब्रुवारी) संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष प्रियंका मोहटे तर प्रमुख अतिथी म्हणून उपाध्यक्ष वर्षा गजभिये, मुख्याधिकारी संघमित्रा ढोके, सभापती गंगू कोहाड, शिक्षण सभापती हिरा आष्टणकर, बांधकाम सभापती देवा बोरकर उपस्थित होते. याप्रसंगी प्रियंका मोहटे यांनी उपस्थितांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. संचालन मीना बोंडे यांनी केले. आभार साहाय्यक प्रकल्प अधिकारी पी. एम. लकडकर यांनी मानले.

नरखेड येथे सीए विद्यार्थ्यांचा सत्कार

नरखेड : श्रीगजानन महाराजांच्या प्रकटदिनाचे औचित्य साधून स्वामी विवेकानंद संस्थेतर्फे येथील सीए झालेला विद्यार्थी सुहास मदन चरडे याचा दीपक ढोमणे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी राजू कुर्वे, पुरुषोत्तम अरमरकर, बेलखेडे, रंजन नासरे, रामदास राऊत उपस्थित होते. संचालन विश्वसराव ढोबळे यांनी केले. आभार रत्नाकर खरबडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी नीलिमा ढोमणे, स्वाती ढोमणे, अनिल चरडे, सुशीला चरडे, टिंगू रेवतकर, अजय वंजारी, प्रिया चरडे, दिनेश रेवतकर, विठ्ठल अरमरकर यांनी सहकार्य केले.

रामटेक येथील ताई गोळवलकर महाविद्यालयात रक्तदान शिबिर

रामटेक : पं.पू. गोळवलकर गुरुजी यांची जयंती बुधवारी (२२ फेब्रुवारी) साजरी करण्यात आली. यानिमित्त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभागी होऊन रक्तदान केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू होते. या प्रसंगी त्यांनी रक्तदानाचे महत्त्व विशद केले. या प्रसंगी दात्यांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रमोहन सिंह यांनी आभार मानले.

पेंढरी येथे गाडगेबाबा जयंती उत्सव

हिंगणा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे ग्रा.पं. पेंढरी (देवळी) येथे संत गाडगेबाबा जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात गाडगेबाबांच्या वेशभूषेत सतीश सोमकुंवर यांनी कीर्तनातून समाजप्रबोधन केले. पौर्णिमा गणवीर यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रात्यक्षिक दाखवून बुवाबाजीवर प्रहार केला. अमोल खवसे यांनी खंजिरीच्या साहाय्याने भजनांच्या माध्यमातून तुकडोजी महाराजांचे विचार प्रकट केले. अध्यक्षस्थानी पेंढरीचे सरपंच राजेंद्र दुधबडे होते. उद्घाटन बोर व्याघ्र प्रकल्पाचे वनपरिक्षेत्राधिकारी जी. एम. लुचे यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक चामाटे, नंदा मेघे, उरकुडे उपस्थित होते. समतादूतांनी नागरिक, विद्यार्थी, महिला व बचतगटापर्यंत समताविचार पोहोचवून जनजागृती केली. कार्यक्रमाला प्रकल्प संचालिका डोंगरे, प्रकल्प अधिकारी लाडे उपस्थित होत्या. संचालन सतीश सोमकुंवर यांनी केले. आभार पौर्णिमा गणवीर यांनी मानले.

प्रायोगिक प्रशिक्षणवर्ग आजपासून

रामटेक : कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागातर्फे २५ फेब्रुवारी ते १७ मार्चदरम्यान दुपारी १२.३० वाजता नासुप्र संकुल, पाचवा माळा येथील विश्वविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागात पदव्युत्तर साहित्य विभागातर्फे 'उत्कीर्ण लेखनशास्त्रावर' तर वेदांग ज्योतिष विभागातर्फे 'हस्तलिखितशास्त्र' प्रशिक्षणवर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणवर्गात संस्कृत विषय घेऊन पदवी व पदव्युत्तर पदवी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. प्रशिक्षणवर्गात सहभागी विद्यार्थ्यांना छात्रवृत्ती देण्यात येणार आहे. इच्छुकांनी नावनोंदणीसाठी डॉ. प्रसाद गोखले व डॉ. कविता होले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले.

बसस्थानक की खिसेकापूंचा अड्डा?

▪ पोलीस चौकी सुरू करण्याची मागणी

पुण्य नगरी नंदू कोल्हे

कामठी : राज्याच्या उपराजधानीचा महत्वपूर्ण भाग म्हणून कामठी शहराची ओळख आहे. त्यामुळे प्रवाशांची ये-जा सातत्याने पहायला मिळते. परंतु, येथील बसस्थानक पाहिले की अंगावर अक्षरशः काटा यायला लागतो. येथे कुठलाही प्रवाशी सुरक्षित नसून नुसता खिसेकापूंचा संचार पहायला मिळतो आहे.

त्यामुळे या परिसरात पोलीस चौकी सुरू करण्याची मागणी समोर आली आहे. नागपूर, रामटेक आणि मौदा याठिकाणी कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. त्यामुळे बसस्थानक गजबजले असते. सकाळी सहा ते रात्री दहा वाजतापर्यंत प्रवाशांची रहदारी पहायला मिळते. तसेच प्रमुख बाजारपेठ असल्याने बाहेरगावावरून येणाऱ्यांची संख्या अधिक असते. परंतु, या बसस्थानकात खिसेकांपूचा वावर आणि विविध समस्यांमुळे प्रवाशांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. उन्हाळ्याच्या दिवसात तर तहान भागवायचे असेल तर बाहेर जाऊन तहान भागवावी लागते. प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून पाणपोयीचीही व्यवस्था करण्यात येते. परंतु, नगरपालिकेकडून त्याला पाणीपुरवठा होत नाही. ही वारंवारची अडचण होत असल्याने याठिकाणी बोअरवेलसुद्धा खोदण्यात आली.

तिलाही पिण्यायोग्य पाणी नसते. याठिकाणी शौचालय, स्वच्छतागृहाचा कमालीचा अभाव आहे. महिला प्रवाशांची तर मोठी कुचंबना होते.रात्रीच्या वेळी सदोदित अंधार असते. याचाच फायदा खिसेकापू आणि काही असामाजिक तत्व घेताना दिसतात. खिसेकापूंची तर टोळीच कार्यरत असल्याची चर्चा आहे. या बसस्थानकाच्या वाढत्या तक्रारीवरून तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षकम रश्मी शुक्ला यांनी कामठी बसस्थानकात पोलीस चौकी सुरू केली होती. मात्र, ती दोन वर्षांपासून कुलूपबंद आहे.

परिसरात जुगाऱ्यांचे अधिराज्य

बसस्थानक परिसरात नित्याचा जुगार भरतो. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशी या जुगाराकडे आकर्षित होतात. त्यांच्याकडून मोठी रक्कमही हिसकावल्या जाते. परंतु, गुन्हेगारी प्रवृत्तीअभावी कुणीही तक्रार करायला धजावत नाही. कामठी पोलिसांचे दुर्लक्ष असते. ही पोलीस चौकी तातडीने सुरू झाल्यास या प्रवृत्तीला आळा बसेल, अशी अपेक्षा कामठीवासींकडून व्यक्त होत आहे.

बेलोनावासींना अनियमित पाणीपुरवठा

▪ ९५ लाखांचा निधी गेला व्यर्थ

पुण्य नगरी / वार्ताहर

बेलोना : शासनाच्या योजनेतर्फे ९५ लाख रुपयांचा निधी मिळाला. मात्र योजनेचा फज्जा उडाल्यामुळे पाणीपुरवठा विभागाकडून येथील नागरिकांना वर्षभर एक दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. उर्वरित काही भागात पाण्याची पातळी खोल गेली असून भारनियमनामुळे दोनतीन दिवस पाणी मिळत नसल्याने नागरिकांमध्ये रोष आहे.

परिसरात पाणीपुरवठा कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे तहान कशी भागणार, असा प्रश्न नागरिकांसमोर निर्माण झाला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी याकडे लक्ष देतील का, याकडे त्यांचे लक्ष लागले आहे. येथील पाणीपुरवठ्याच्या विहिरी कोरड्या पडल्या आहेत. बोअरवेलमधून निघणारे पाणी कमी झाल्यामुळे नागरिकांना पाणी मिळेनासे झाले आहे.

नियमित भरपूर पाणी मिळावे यासाठी अद्याप ठोस निर्णय घेण्यात आला नाही. नरखेडसारखे चिखली धरणाचे पाणी आणण्याचा प्रयत्न झाला असता तर काही प्रमाणात पाणीसमस्या कमी झाली असती, असे मत येथील जाणकारांनी व्यक्त केले आहे. वरिष्ठ पातळीवरून निर्णय घेऊन येथील पाणीसमस्येवर तोडगा काढावा, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू

खापरखेडा : अपघातात गंभीर जखमी झालेल्या इसमाचा मंगळवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला.

पंकज बाळकृष्ण मेश्राम (२७, सुपरएक्स कॉलनी, कोराडी) असे मृतकाचे नाव आहे. तो १० जानेवारी रोजी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास एमएच ४०/ एजी ५५३५ क्रमांकाच्या दुचाकीने भरधाव जात होता. दरम्यान सावनेर ते नागपूर महामार्गावरील हॉटेल आशियानासमोर त्याचे वाहन अनियंत्रित होऊन खाली पडल्याने पंकज व त्याचा साथीदार निखिल रमेश धोटे (३१,पांजरा, कोराडी) हे दोघे गंभीर जखमी झाले. मात्र पंकजचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी फिर्यादी पोलीस उपनिरीक्षक पराग रामटेके यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी खापरखेडा पोलीस स्टेशनमध्ये आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद केला.

मराठी भाषा गौरवदिनानिमित्त परिसंवाद

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

रामटेक : मराठी भाषा गौरवदिनानिमित्त कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय व ताई गोळवलकर महाविद्यालयातर्फे बुधवारी (२२ फेब्रुवारी) परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. 'मराठीसमोरील आव्हाने, उपाय आणि लोकसहभाग' या विषयावर राकेश मर्जिवे, त्रिलोक मेहर, प्रा. जगदीश गुजरकर, प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे आदींनी चिंतनशील विवेचन केले.

परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे वित्त व लेखाधिकारी डॉ. रामचंद्र जोशी होते. या प्रसंगी त्यांनी संस्कृतसोबतच मराठी भाषेच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केले. या वेळी कुलगुरू डॉ. उमा वैद्य, कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू, नगरसेवक विवेक तोतडे, सरपंच योगिता गायकवाड यांनी शुभेच्छासंदेश दिला. कविवर्य वि.वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रजांचा जन्मदिन २०१३ पासून 'मराठी भाषा गौरवदिन' म्हणून साजरा करण्यात येतो. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वतीने सोमवारी (२७ फेब्रुवारी) मराठी भाषा गौरवदिन साजरा करण्यात येणार आहे. संचालन सुमीत कठाळे यांनी, तर प्रास्ताविक प्रा. ईशा वडोदकर यांनी केले. आभार संजय वाते यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. पांडे, उमेश पाटील, श्यामसुंदर डोबले, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

नियमबद्ध शुद्धलेखनासाठी कार्यशाळा : डॉ. वैद्य

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

▪ मराठी प्रमाणभाषेवर कार्यशाळेचे आयोजन

रामटेक : मराठी शुद्धलेखनाचे संस्कार बालपणापासून जाणीवपूर्वक स्वतःवर करून घ्यावे लागतात. पूर्वीचे शिक्षक भाषाशुद्धीबाबत आग्रही आणि काटेकोर होते. शिष्टसंमत भाषेला व्याकरणाचे नियम लागू आहेत. त्यामुळे भाषावापरावर नियंत्रण राहते. म्हणूनच बोली आणि प्रमाणभाषेत भेद केला जातो. व्याकरणबद्ध लेखनच काळाच्या कसोटीवर टिकून राहते. म्हणून अशा शुद्धलेखन कार्यशाळांचे महत्त्व वादातीत आहे. नियमबद्ध आणि शुद्ध लिहिण्याबोलण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त ठरतात. शिक्षकांनी जागरूक राहून नियम आत्मसात करावे. भाषा शिष्टसंमत आणि प्रमाण असण्यासाठी प्रयत्नरत असावे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी केले.

मराठी भाषा गौरवदिनानिमित्त कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या मुख्यालयात २२ फेब्रुवारी रोजी मराठी प्रमाणभाषेवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले त्या वेळी त्या बोलत होत्या. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी वित्त व लेखाधिकारी डॉ. रामचंद्र जोशी होते. उद्घाटन डॉ. विजयकुमार यांनी केले. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, मार्गदर्शक प्रा. दीपक रंगारी, डॉ. रेणुका बोकारे व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. बोकारे यांनी केले. व्याकरण भाषेचा पाया आहे. भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र म्हणजे व्याकरण. आपण जे बोलतो, लिहितो ते नीट, व्यवस्थित, आकर्षक, शुद्ध ठेवण्यासाठी व्याकरणाध्ययन अपेक्षित आहे, असे डॉ. विजयकुमार या वेळी म्हणाले. प्रा. दीपक रंगारी यांनी विभक्ती प्रत्यय, शुद्धाशुद्ध शब्दांतील भेद, अर्थभेद, व्याकरण आणि शुद्धलेखननियमावर चर्चा करीत दैनंदिन उपयोगात येणाऱ्या शब्दांची शुद्धाशुद्धतेवर मार्गदर्शन व जिज्ञासूंचे शंकानिरसन केले. या प्रसंगी प्रा. दीपक रंगारी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. उमा वैद्य होत्या. डॉ. दीपक कापडे प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. बोकारे यांनी आभार मानले.

जनावरांची अवैध तस्करी; आरोपीस अटक

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

कळमेश्वर : जनावरांची अवैध तस्करी करणाऱ्या आरोपीस पोलिसांनी गजाआड केले. ही कारवाई २१ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास तालुक्यातील गोंडखैरी टोलनाका येथे करण्यात आली.

कळमेश्वर पोलिसांचे पथक गस्तीवर असताना त्यांना काही जण जनावरांची अवैध वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली. ही माहिती त्यांनी नागपूर ग्रामीणच्या नियंत्रण कक्षाला दिली. त्यांनी तत्काळ घटनास्थळ गाठून वाहनाचा पाठलाग केला असता त्यांना एमएच ४०/ वाय ३३८२ क्रमांकाचा ट्रकचालक आरोपी नसीम अख्तर अहमद (३५, वासीपुरा, कामठी) व अन्य दोन आरोपी हे जनावरांची अवैध तस्करी करताना आढळून आले. पोलिसांनी ट्रकची झडती घेतली असता त्यामध्ये १९ जनावरे आढळून आली. मात्र आरोपी फिर्यादीला मारहाण करून घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून एक मोबाइल, वाहन असा एकूण ९ लाख ४२ हजार ५०० रुपयांचा ऐवज जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी फिर्यादी जितू अशोककुमार कुंदवानी (३०, कळमना, नागपूर) यांच्या तक्रारीवरून कळमेश्वर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करून अटक केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कामडी करीत आहेत.

आडवे शब्द

१. कवी 'माधव ज्युलियन' यांचे फक्त आडनाव
५. ज्येष्ठ साहित्यिक 'आत्माराम रावजी देशपांडे' यांचे कवी म्हणून प्रसिद्ध असलेले टोपणनाव
८. कवी 'आरती प्रभू' यांचे फक्त मूळ आडनाव
१३. भोवळ, घेरी, फेरी, भ्रमण
१४. एकंदरीने, निवड न करता
१६. लोकांचे भले, जनकल्याण
१७. तोंडाने म्हटलेली उजळणी
१९. गोणपाट, पोत्याचा तुकडा
२०. ज्वर, ताप (हिंदी)
२१. मुस्लिम धर्मियांचा एक पवित्र महिना
२३. पल्ला, पोच, प्रवासाचा पार केलेला टप्पा
२४. देवपूजेच्या वेळी पेटवतात तो एक सुगंधी ज्वालाग्राही पदार्थ
२६. फिकीर, पर्वा
२८. दूधात तांदूळ, साखर इ. घालून बनवलेला एक पदार्थ, लापशी
२९. रेडा, हल्या
३०. तल्लीन, सर्वांशी मिसळून राहणारा
३१. वडिलांची बहीण, आत्या
३३. खेप, क्रम, कानाचे खालचे टोक
३४. तोंड, मुख
३६. सोने, कांचन
३७. बेताचा, सुमाराचा, मध्यम, योग्य
३९. पुण्याची वस्तू किंवा व्यक्ती
४०. विभाग, आळी, वस्ती, वाडी (उर्दू)
४२. भारताचा एक माजी क्रिकेटपटू-किरण **
४३. चेटूक, जारणमारण इ. प्रयोग, कृती
४४. पाण्याचे वायुरुप, वाफ
४५. प्रेमयुक्त, स्नेहशील, दयाळू
४६. रमलेला, तल्लीन झालेला
४८. पात्र, योग्य, अनुरुप
४९. पैसा, किंमत, मोल
५०. औषध
५२. पाकिस्तानचा एक क्रिकेटपटू-कामरान ****
५३. शहरे वसविणाऱ्या 'सिटी अॅन्ड इंडिस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन' संक्षिप्त रुप
५४. महाराष्ट्रात पूर्व-पश्चिम दिशेने विस्तारलेला पर्वत
५६. मनोज कुमार व नंदा यांचा एक चित्रपट
५७. घोड्यावर बसून हॉकीसारखा खेळायचा एक खेळ
५८. राहुल गांधींचा उत्तर प्रदेशातील मतदारसंघ
६०. जागा, सावध, जागृत
६२. अक्षयकुमार, सुनील शेट्टी व शिल्पा शेट्टी यांचा एक चित्रपट
६४. जोडीदार, सोबती, सहकारी
६५. मोठा चाकू, लहान सुरा
६६. खेप, पाळी (हिंदी), खिडकी
६७. एक गायिका-साधना ****
६९. कविता लिहिणारा, काव्यकर्ता
७०. अर्धा, निम्मा (हिंदी)
७१. कोणत्या वेळी, केव्हा (हिंदी)
७२. पोपट, राघू
७३. अनिल कपूर व सनी देओल यांचा एक चित्रपट
७५. अज्ञानपणा, दुर्बलता, अकार्यक्षमता (उर्दू)
७७. जैसे कर्म तैसे ** (म्हण)
७८. सहाय्य, हातभार
७९. थकवा, ग्लानी
८०. उणीव, न्यनता, कमीपणा

उभी विधाने

१. बेचव, सपक, पाणचट, नीरस
२. गाड्यांची समोरासमोर होणारी धडक, झोंबी, सामना
३. बाहेरुन, वरकांती, वरपांगी
४. शीर, नाडी, स्नायू
५. परिणाम, प्रभाव (हिंदी)
६. जवळ, समीप
७. डोक्यावरील केसांची 'बट' (हिंदी)
८. च्यापेक्षा कमी, किंचित न्यून, च्या नंतरचा
९. चाकर, सेवक, गडी
१०. नशीब, भाग्य (इंग्रजी)
११. एक जुन्या मराठी गायिका-सुमन *****
१२. युद्ध, वाळवंट
१५. रत्न (हिंदी)
१८. चर्मकील, चामफोड
२०. शेतात पशुपक्ष्यांना घाबरवण्यासाठी उभे केलेले बाहुले
२२. जादूटोणा, मंत्रप्रयोग, करणी
२३. धान्य मोजण्याचे एक जुने परिमाण
२४. कर्म, कार्य, उद्योग
२५. बंगाली मिठाईचा एक प्रकार
२७. 'सत्तेचे गुलाम', 'करीन ती पूर्व' या नाटकांचे लेखक
२९. जमाव, घोळका, गुंडांची गँग
३०. सूर्य (इंग्रजी), वर्ष, साल
३२. रंग, छटा, समाजातील वर्ग
३३. पवित्र, शुद्ध, साखरेची चासणी
३५. दोन डोंगरांमधील खोल भाग, खोरे
३६. जपानी गलेलठ्ठ पैलवानांचा एक प्रकार
३८. केस विंचरण्याचे साधन, कंगवा
३९. कुबेराचे विमान
४०. मेण (हिंदी)
४१. हळकुंडाची पूड
४३. जास्तीत जास्त, उच्च मर्यादा, कहर
४४. मुरलीधर कापडी दिग्दर्शित रंजनाचा एक चित्रपट
४५. देव आनंद व वहिदा रेहमान यांचा एक चित्रपट
४७. माझे (संस्कृत)
४८. अतिकौतुक, लालन, एक आडनाव
४९. दंत, रदन
५१. पंढरपूरची वारी करणारा
५२. 'अरे संसार संसार' या चित्रपटातील खलनायक
५३. श्रीलंकेचे जुने नाव
५४. ** बुद्धी नाठी (म्हण), करिता
५५. कलंक, काळिमा, लांच्छन, नग
५७. पोंग, कुबड, बाक
५९. एक कडू चवीची पालेभाजी
६१. दिमाखदार, ऐटदार
६२. विस्तवाची आच, जाळ, शेकोटी
६३. कोलकाताच्या विमानतळाचे ठिकाण
६५. गोपाळ गणेश आगरकर यांनी सुरु केलेले एक साप्ताहिक
६८. दाणेदार, कणीदार
६९. कमी, कमती (हिंदी)
७०. यावेळी, याक्षणी
७१. तंबूचे कापड किंवा कापडी भिंत
७३. रात्र, रजनी (हिंदी)
७४. जखमेची शरीरावर राहणारी खूण
७६. उद्योगपती मुकेश अंबानींच्या पत्नीचे फक्त नाव

शनिवार, २५ फेब्रुवारी २०१६ पुण्य नगरी **शब्दखेळ**



कालच्या शब्दखेळचे उत्तर

रे	व	ती	■	वि	शा	खा	■	चि	त्रा	■	अ	नु	रा	धा
ल	ग	ट	■	ना	ई	क	■	र	ण	■	ट	क	म	क
चे	■	■	गा	य	■	■	मा	का	■	व	ळ	सा	■	■
ल	व	■	भा	क	ड	■	मा	ल	व	ण	■	न	का	शा
■	न	त	■	दा	म	ले	■	■	न	वा	र	■	या	दी
■	रा	न	■	मो	ड	क	सा	ग	र	■	म	न	पा	■
वि	ज	य	क	द	म	■	ग	वा	क्ष	■	ल	व	ल	व
श्व	■	■	धी	र	■	रा	वा	■	क	न्या	■	मी	ट	र
ना	ट	क	■	सा	व	धा	न	■	■	हा	र	■	■	मा
थ	क	वा	■	व	र्ण	न	■	ज	न	सी	त	■	सा	य
प्र	■	ड	का	र	■	ग	व	ग	वा	■	न	का	र	■
ता	न	■	का	क	■	सी	म	■	ब	म	■	सा	थी	या
प	र	त	■	र	मा	■	न	र	म	■	श	र	■	ता
सिं	ह	ग	ड	■	न	या	■	का	लि	क	त	■	का	या
ग	र	■	फ	र	व	सी	■	ना	क	■	क	र	व	त